द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् ॲन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA STATE CHEMISTS & DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor, Opp. Jaigopal Industrial Estate, Baburao Parulekar Marg, Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भ : एमएससीडीए/८०/२०२१ दि.१७.०५.२०२१

**सर्व मुख्य कार्यकारिणी पदाधिकारी**
**सर्व झोन कार्यकारिणी पदाधिकारी / अध्यक्ष / सचिव जिल्हा संघटना**
**महाराष्ट्र राज्य केमिस्टस् ॲण्ड ड्रगिस्टस् असोसिएशन**

**विषय : औषध विक्रेत्यांमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या भूमिकेबाबत तीव्र असंतोष..**

महोदय,

यापत्रासोबत वरील विषयास अनुसरुन प्रेस नोट जोडलेली आहे. सदर प्रेस नोट आपण आपल्या जिल्ह्यातील विविध वृत्तपत्रामधून प्रसिध्दीस द्यावी व ती प्रसिध्द होईल याची काळजी घ्यावी.

विविध वृत्तपत्रामधून प्रसिध्द झालेली बातमीची एक प्रत राज्य संघटनेच्या कार्यालयात पाठविण्यात यावी.

कळावे.

आपले नम्र
**दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**अनिल नावंदर**
**सचिव**

द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् अ‍ॅन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

**प्रेसनोट**

**औषध विक्रेत्यांमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या भूमिकेबाबत तीव्र असंतोष..... जगन्नाथ शिंदे**

महाराष्ट्रासह संपूर्ण देशात कोविड -१९ च्या प्रादुर्भावाची पहिली लाट ओसरुन दुसऱ्या लाटेला आपण सर्वजण सामोरे जात आहोत. कोविड – १९ च्या महामारीत अग्रक्रमाने काम करणाऱ्यांच्या यादीत कोविड योद्धा म्हणून औषधी विक्रेत्यांच्या सेवेकडे सरकारने संपूर्णतः दुर्लक्ष केलेले आहे.

लसीकरण कार्यक्रम सुरु झाला, औषधी विक्रेता व तेथील कर्मचारी हे आपल्या जीवावर उदार होऊन २४ तास सेवा देत आहेत व त्यामुळेच संपूर्ण देशासह महाराष्ट्रात औषधी पुरवठा सुरळीत राहण्यात मोठी मदत झालेली आहे. औषधी विक्रेत्यांचा प्रत्यक्ष संबंध हा कोविड पेशंट अथवा त्यांच्या संपर्कात आलेल्या नातेवाइकांशी जवळून येतो व त्यात त्याच्या दुष्परिणामांना सामोरे जावे लागण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

महाराष्ट्रासह देशात २०० पेक्षा अधिक औषध विक्रेते कोविड – १९ चे बळी पडले असून, १००० च्या जवळपास परिवारातील त्यांचे नातेवाईक बाधित झालेले आहेत असे असूनही केंद्र वा राज्य सरकारने कोविड योद्धा म्हणून सन्मान तर दिला नाहीच परंतु साधे लसीकरणात प्राधान्य देण्याचे औदार्य देखील दाखवले नाही याची खंत सर्व औषधी विक्रेते त्यांचे कर्मचारी यांच्या मनात असून ते सरकारच्या या भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत आहेत.

संघटनेने वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहाराचीही दाखल शासनाने घेतली नाही. सरकारची भूमिका अशीच राहिल्यास सभासदांचा वाढता दबाव लक्षात घेता संघटनेलला संपूर्ण लॉकडाऊनमध्ये सहभागी होऊन व्यवसाय बंद करण्याशिवाय पर्याय राहणार नाही याची शासनाने गंभीर दखल घ्यावी. अन्यथा आम्हाला नाईलाजास्तव व्यवसाय बंदची भूमिका घ्यावी लागेल असा इशारा अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष श्री. जगन्नाथ शिंदे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिलेला आहे.

****